CURRENT GLOBAL REVIEWER

ISSN : 2319 – 8648 Impact Factor : 2.143 SPECIAL ISSUE Issue I, Vol II , 10th Feb. 2018

# जागतिकीकरण व भारतीय शिक्षण : संधी आणि आव्हाने

**डॉ. सुरेश ए. घुमटकर**

*सहाय्यक प्राध्यापक व विभाग प्रमुख, अर्थशास्त्र विभाग, बलभीम महाविद्यालय, बीड.*

**डॉ. माधव एच. शिंदे**

*स. प्राध्यापक , अर्थशास्त्र विभाग, अहमदनगर महाविद्यालय, अहमदनगर.*

---------------(9)---------------

**प्रस्तावना :**

जागतिकीकरण ही द्विधारी तलवार आहे. योग्यरित्या हाताळली तर विजय मिळतो आणि कुशलतेने हाताळली गेली नाही तर स्वतःचे प्राण गमवावे लागतात. (जोसेफ स्टीगलीट्झ) जागतिकीकरणाच्या प्रक्रीयेचा फायदा घेवून अनेक देशांनी विकासाचा वृध्दीदर वाढविला. उदाहरणार्थ चिन, तर काही विकसनशील राष्ट्रे यामुळे अविकसीततेच्या दिशेने वाटचाल करीत आहेत. जागतिकीकरणाचे फायदे घेता यावे यासाठी चिन सारख्या देशाने विनंती करून जागतिक व्यापार संघटनेचे सदस्यत्व (२००१ मध्ये) मिळविले आहे. भारत हा १९९५ पासून म्हणजे संस्थापक सदस्य देश आहे. भारताने १९९१ पासूनच जागतिकीकरणाच्या प्रक्रीयेत प्रवेश करून मुक्त अर्थव्यवस्थेचे धोरण स्विकारून वस्तू आणि सेवांच्या व्यापारासह उत्पादन घटकांच्या आंतरराष्ट्रीय व्यापारस स्विकृती दिली आहे. शिक्षणाची महत्त्वाची सेवा क्षेत्रात भूमिका असते. याचा फायदा घेण्यासाठी भारतीय लोकसंख्या लाभांष (Population Dividend) या संकल्पने नुसार भारतास फायदा करून घेता येतो.

जागतिकीकरणाच्या प्रक्रीयेतून भारतीय शिक्षण व्यवस्थेत निर्माण झालेल्या संधी सद्य परीस्थतीत भारतीय शिक्षण व्यवस्थेची स्थिती आणि निर्माण झालेली आणि होणारी आव्हाणे यांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न येथे करण्यत आला आहे. यासाठी भारतातील शिक्षण व्यवस्थेचा इतिहास, जागतिकीकरणाच्या शिक्षण क्षेत्रातील अनुभवाचे विश्लेषण, संख्यात्मक आणि गुणात्मक, सद्यस्थिती, शैक्षणिक सुधारणाची आवश्यकता आणि जागतिकीकरणाच्या प्रक्रीयेतून घेता येवू शकणारी फायदे अशा स्वरूपात संशोधन पेपर तयार करण्याचा प्रयत्न येथे करण्यात आला आहे.

**भारतातील शिक्षण व्यवस्थेचा इतिहास :**

इ.स. पूर्व ३००० च्या पूर्वी भारतात गुरूकुलाच्या स्वरूपात शिक्षण व्यवस्था अस्तित्वात होती याचे पुरावे रामायण आणि महाभारत या पौराणिक ग्रंथात सापडतात. वयाची पहीली पंचेवीस वर्षे ज्ञानार्जन करावे, पुढील पन्नास वर्षे कार्य करून अर्थ कमवावे अशी वयाची विभागणी केलेली आढळते. याचा अर्थ पदवित्तरच्या पुढील उच्च शिक्षणाची व्यवस्था तेंव्हा अस्तित्वात असावी. नंतरच्या काळात वैदीक शिक्षण व उच्च शिक्षणासाठी विद्यापिठाचे अस्तित्व भारतापासूनच सुरू झाले. असे म्हटले जाते की `जगातील पहीले विद्यापिठ` तक्षशिला येथे इसवी सन पूर्व ७०० च्या दरम्यान स्थापन झाले होते. जगभरातील १०५०० पेक्षा जास्त विद्यार्थी व ६० पेक्षा जास्त विषय तेथे शिकविले जात होते. भारतातील बिहार या प्रदेशात इसवी सन पूर्व ४ थ्या शतकात जगप्रसीध्द `नालंदा विद्यापिठ` स्थापन झाले होते. चिन, जावा, इंडोनेशिया आणि थायलंड इतयादी देशातील विद्यार्थ्यां ज्ञानार्जन करण्यासाठी येथे येत असत. जवळपास १०,००० विद्यार्थ्यांची क्षमता येथील वसतीगृहात होती. इ.स. १२ व्या शतकात हे विद्यापिठ आणि त्याचे ग्रंथालय नष्ट करण्यात आले व भारतीय समाज ज्ञानासाठी परावलंबी झाला.

**समाज सुधारकांचे शिक्षणातील योगदान :-**

स्त्रीयांना आणि दलीत-बहुजनांना शिक्षणापासून भारतीय समाजात वंचित ठेवले गेले. नेल्सन मंडेलांनी म्हटल्यानुसार `शिक्षण हे दारीद्रय कमी करून विकास घडवून आणणारे महत्वपूर्ण शस्त्र आहे`. समाजाच्या या प्रवर्गास शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी बऱ्याच सामाजिक सुधारकांनी भूमिका बजावलेली आहे. यात राजाराम मोहन रॉय, इश्वरचंद्र विद्यासागर, स्वामी दयानंद सरस्वती, केशव चंद्र सेन, धोंडो केशव कर्वे इत्यादींनी ब्राम्हण समाजातील मुलींना शिक्षण मिळावे यासाठी प्रयत्न केलेत. परंतू इतर समाजातील स्त्रीयांबद्दल आणि बहुजनांबद्दल त्यांच्यात उदासीनता होती. खऱ्या अर्थाने सर्व समाजातील मुर्लीसाठी आणि बहुजन वर्गातील मुलांसाठी शिक्षणाची द्वारे खुली केलीत महात्मा जोतिबा फुलेंनी, सावित्रीबाई फुलेंनी १८४८ पासून बडोदा येथील महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी आपल्या संस्थानात प्राथमिक शिक्षण सर्वांना सक्तीचे केले. कोल्हापूरचे राजर्शी शाहु महाराज यांनी आपल्या संस्थानात बहुजनांसाठी



Scanned by PDF Scanner